# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३०३ - २३** **दिनांक : - ०६/०९/२०२३**

## पोलीस रखवालीतुन पळालेल्या आरोपीतास ४ तासांत अटक

## नवघर पोलीस ठाणे – गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी

सर जे जे मार्ग पोलीस ठाणे, मुंबई गुन्हा रजि. नं. I ३३०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम २२४ प्रमाणे गुन्हयातील आरोपी नामे विवेक विश्वनाथ तोरडे वय-२६ वर्षे, धंदा-रिक्षाचालक, रा-इंदिरानगर झोपडपटटी, भाईंदर-पुर्व, ठाणे हा तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे न्यायबंदी आहे. नमुद आरोपी यास जे.जे हॉस्पीटल मुंबई येथे दवाउपचार चालु असतांना तो दि.०६/०९/२०२३ रोजी जे.जे. हॉस्पीटल मुंबई येथुन पोलीस रखवालीतुन पळुन गेलेबाबत पोहवा/१५५६ इम्रान शेख,नेम.नवी मुंबई पोलीस मुख्यालय यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वर नमुद प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर बाबत सर जे जे मार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्री कलीम शेख यांनी नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय पवार यांना माहिती दिली होती. नमुद आरोपी हा मालमत्तेच्या गुन्हयांमधील सराईत आरोपी असल्याने तसेच तो नवघर पोलीस ठाणे हद्दीतील इंदिरानगर झोपडपटटी, भाईंदर-पुर्व, ठाणे येथे रहावयास असल्याने त्याचा वपोनि/विजय पवार यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकास त्याचा शोध घेणेबाबत आदेशीत केले होते. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/संदिप पालवे, पोउनि/ज्ञानेश्वर आसबे व त्यांचे पथकाने सदर आरोपीचा कसोशिने नमुद परिसरात शोध घेतला असता आरोपी हा स्मशान भुमी, इंदिरानगर झोपडपट्टी, नवघर गाव, भाईंदर पुर्व येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यास सर जेजे मार्ग पोलीस ठाणे मुंबई यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग अति.कार्यभार नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, स.पो.नि.संदिप पालवे, पो.उप.निरी.ज्ञानेश्वर आसबे, पो.हवा.पाटील, भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, ओंकार यादव, पो.अं.सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव सर्व नेमणुक नवघर पोलीस ठाणे तसेच पो.हवा. प्रितेश शिंदे, पो.अं. संदिप भेरे नेम.सर जेजे मार्ग पोलीस ठाणे मुंबई यांनी केलेली आहे.




----0000----